दै. पुण्यनगरी दि. २४.०१.२५

# अपहृत चिमुकलीची पोलिसांनी केली सुखरुप सुटका



**माळाकोळी / प्रतिनिधी**

मोहिजा ता.कंधार येथील अपहरण झालेल्या मुलीची पोलिसांनी सुखरुप सुटका केली असुन या प्रकरणी माळाकोळी पोलिस ठाण्यात महिलेस तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माळाकोळी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मोहिजा परंडा ता.कंधार येथील ६ वर्षीय मुलगी दि. २० जानेवारी रोजी सायंकाळी गावातून बेपत्ता झाली होती.याबाबत माळाकोळी पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला.या घटनेची दखल घेत पोलिस अधीक्षक अविनाश कुमार, अपर पोलिस अधीक्षक डॉ.खंडेराव धरणे, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनात अपहरण झालेल्या मुलीच्या शोधासाठी ९ तपास पथके नेमली होती. स्थानिक गुन्हे शाखा आणि माळाकोळी पोलिस तपास करीत होते.दि. २२ जानेवारी रोजी पोलिसांच्या संयुक्त पथकाने **(पान ४ वर...)**

दै. सत्यप्रभा दि. २४.०१.२५

# अंधश्रद्धेतून अल्पवयीन मुलीला डांबून ठेवले

## दोन दिवसानंतर मुलीची सुटका : महिलेसह तिघांना अटक

## कंधारच्या मोहिजा परंडा येथील धक्कादायक घटना



**लोहा, दि. २३ :** कंधार तालुक्यातील मोहिजा परंडा येथील सात वर्षीय मुलगी दोन दिवसांपूर्वी सोमवारी (दि. २०) बेपत्ता झाली होती. रात्र झाली तरी ती घरी न आल्याने घरच्यांची धाकधूक वाढली. शेवटी तिच्या पालकांनी माळाकोळी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी मुलगी हरवली अशी नोंद घेतली. दुसऱ्या दिवशी पोलिसांत अपहरणाची तक्रार नोंदविण्यात आली. त्यानंतर माळाकोळी पोलिसांनी मुलीचा शोध घेतल्यानंतर दोन दिवसांनी चिमुरडी गावातच एका घरात सापडली. या मुलीला एका महिलेने आपल्या घरात डांबून ठेवल्याचे तपासातून पुढे आले असून पोलिसांनी याप्रकरणी या महिलेसह तिघांना अटक केली आहे.

दरम्यान, अंधश्रद्धेतून या मुलीचे अपहरण केल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी या मुलीची सुखरुप सुटका केल्याने कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. पोलिसांनी गावातील शोभाबाई ***(पान दोनवर)***

### अंधश्रद्धा की आणखी काही कारण ?

**अंधश्रद्धेच्या कारणावरून मुलीचे अपहरण करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. मात्र, ठोस पुरावा अजून सापडलेला नाही. अंधश्रद्धा की आणखी काही कारणांनी तिचे अपहरण केले याचा तपास केला जात आहे. तिन्ही आरोपींना अटक केली असून सखोल तपास सुरु असल्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले.**